

# इतिहास-नागरिकशास्त्र - लेख-१९

**कविता मसुरकर, शाळा :** इ.ए.सो. दिगंबर पाटकर विद्यालय, दादर.

**सराव प्रश्नपत्रिका**

वेळ - २ तास | गुण - ४०

**प्रश्न अ) खालील विधानांपुढे कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (३)

i) संन्यासी राष्ट्र म्हणून ---- हा देश ओळखला जात असे.
(भारत, चीन, जपान)

ii) संयुक्त राष्ट्रसंघटनेची पायाभरणी १९४१ च्या ऑगस्टमधील ---- सनदेने केली.
(अटलांटिक, याल्टा, तेहरान)

iii) इंग्लंडच्या संसदेने १७६४ साली ---- नावाचा कायदा संमत केला.
(स्टॅम्प ॲक्ट, शुगर अक्ट, आयात कर)

**ब) योग्य जोड्या जुळवा.** (३)

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| i) युरी गागारिन | a) चौदा कलमी योजना जाहीर |
| ii) वुड्रो विल्सन | b) फ्रान्सचा अर्थमंत्री |
| iii) रूसो | c) पहिला अवकाशयात्री |
| | d) इंग्लंडचे पंतप्रधान |
| | e) फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्गाता |

**प्रश्न २) खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.** (४)

i) राष्ट्रसंघाची उद्दिष्टे कोणती होती?
ii) भारतात राष्ट्रीय भावनेचा उदय होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या?
iii) युरोपात भांडवलशाहीची पायाभरणी कशा प्रकारे झाली?

**प्रश्न ३) खालीलपैकी दोन विधानांची कारणे प्रत्येकी २० ते २५ शब्दांत लिहा.** (४)

i) आफ्रिकेबद्दल युरोपीय लोकांची जिज्ञासा जागृत झाली.
ii) जागतिकीकरण म्हणजे नववसाहतवाद असे समीकरण झाले आहे.
iii) ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.

**प्रश्न ४) खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ४० ते ५० शब्दांत लिहा.** (६)

i) संगणकाचे कोणते उपयोग मानवी जीवनात होतात?
ii) अमेरिकन वसाहतवाल्यांच्या प्रतिनिधींनी 'ना प्रतिनिधी ना कर' अशी घोषणा का केली?
iii) इंग्रजांनी भारतात आपला व्यापार वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न केले?

**प्रश्न ५) खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत लिहा.**

i) पहिल्या महायुद्धानंतर हुकूमशाहीच्या उदयास कोणती परिस्थिती कारणीभूत ठरली?
ii) फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम लिहा.
iii) दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम लिहा?

## नागरिकशास्त्र

**प्रश्न ६) खालील विधानांपुढे कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (२)

i) राज्यसभेत घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून ---- सदस्य निवडले जातात.
(२२६, २३८, २५०, ५५०)

ii) अंदमान व निकोबार या केंद्रशासित प्रदेशांचा समावेश ---- उच्च न्यायालयाच्या कक्षेत येतो.
(कोलकाता, गुवाहटी, चेन्नई, मुंबई)

**प्रश्न ७) खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २० ते २५ शब्दांत लिहा.** (४)

i) राष्ट्रपतीपदासाठी कोणती पात्रता आवश्यक आहे?
ii) न्यायाधीश पदच्युत केव्हा होऊ शकतो?
iii) संघसूचीत कोणत्या विषयांचा समावेश होतो?

**प्रश्न ८) खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २० ते २५ शब्दांत लिहा.** (४)

i) 'महानगरपालिका आयुक्त' यावर टीप लिहा.
ii) पंतप्रधानांची कोणतीही दोन कामे स्पष्ट करा.
iii) ग्रामसेवक यावर टीप लिहा.

**प्रश्न ९) खालीलपैकी एका प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा.** (२)

i) स्थानिक शासनसंस्थांचे महत्त्व स्पष्ट करा.
ii) लोकसभेची रचना लिहा.

**उद्याचा विषय :सराव प्रश्नपत्रिका (भूगोल-अर्थशास्त्र)**



संपर्क : yashasvibhava2007@gmail.com